# सोने दिवाळीपूर्वी ३२ हजारांवर

## ■ बॉम्बे बुलियन असोसिएशनचे अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी यांचा अंदाज

**मुंबई,** दि. २९ (पी. टी. आय.) - दिवाळीपूर्वी सोने प्रति १० ग्रॅम ३२ हजारांवर पोहचेल, असा अंदाज बॉम्बे बुलियन असोसिएशनने व्यक्त केला आहे.

मध्य - पूर्वेत असलेला तणाव लक्षात घेता सोन्यातील गुंतवणूक सर्वात सुरक्षित आहे हे लक्षात घेऊन गुंतवणूकदार पुन्हा सोन्याकडे वळतील. सिरियातील यादवी युद्ध आणि इराणसोबत असलेला तणाव ही कारणे भारत, चीन आणि अन्य देशातील सोन्याच्या मागणीला आणि



किंमती वाढविण्यास कारणीभूत ठरतील, असे बीबीएचे अध्यक्ष आणि रिद्धीसिद्धी बुलियन्सचे व्यवस्थापकीय संचालक पृथ्वीराज कोठारी यांनी एका प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

अमेरिका भारताबरोबरच्या तिसऱ्या बैठकीत उभय देशातील वाणिज्य - व्यापाराला चालना मिळण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम विदेशातील सोन्याचा भाव १८०० डॉलर्स प्रति औंस वाढण्याची शक्यता कोठारी यांनी व्यक्त केली.

भारतीय रिझर्व्ह बँक सप्टेंबरमध्ये तिमाही पतधोरणात उपाययोजना करण्याची अपेक्षा भारतीय गुंतवणूकदारांना असल्याने त्याचाही परिणाम सोने ३२ हजारांवर जाण्यात होईल, असेही ते म्हणाले.